

# (B) Elective Subjects

## मराठी साहित्य

**प्रास्ताविक**

ज्या विद्यार्थ्यांना मराठी साहित्याच्या अभ्यासात अधिक रस आहे त्यांच्यासाठी हा विषय शिकविला जाईल. मराठी हा विषय 'आधुनिक भारतीय भाषा' म्हणून वैकल्पिक स्वरूपात सध्याच्या अभ्यासक्रमात उपलब्ध आहे. तो तसाच राहील. मात्र त्यात व्याकरण, उपयोजित मराठी यांचा समावेश आहे; तसा मराठी साहित्य या विषयाच्या अभ्यासक्रमात करता येणार नाही.

सध्याच्या काळात भाषांच्या अभ्यासाचे महत्त्व कमी होत चालले आहे. भाषांच्या अभ्यासाकडे होणाऱ्या दुर्लक्षाचे परिणाम काही वर्षांनी तीव्रतेने जाणवू लागणार आहेत. मानवजातीने सर्व ज्ञान आजवर भाषेच्या माध्यमातून जोपासले व वाढविले आहे, जतन केले आहे. भाषेचा व्यावहारिक उपयोग शिकविण्याची जी गरज आहे, ती भागविण्यासाठी सध्याचा नववी व दहावीचा मराठीचा अभ्यासक्रम व इ. ११ वीचा नवा प्रस्तावित 'उपयोजित मराठी' हा अभ्यासक्रम सक्षम आहे. परंतु मराठी साहित्य हा विषय उपलब्ध व्हावयास हवा, याची काही वेगळी कारणे आहेत.

साहित्य किंवा ललित वाङ्.मय हे मानवी जीवनाचे सर्व अंगांनी चित्रण करीत असते. प्रत्येक माणूस जीवनाच्या विविधांगी स्वरूपाचा अनुभव घेऊ शकेल, असे नाही. एका माणसाचा जीवनानुभव मर्यादितच असतो. पण साहित्य त्याला मानवी जीवनाचा, भावनांचा, विविध अनुभवांचा पट उलगडून दाखविते व त्याची जीवनविषयक जाणीव समृध्द करते. सध्याच्या काळात जीवनातील गुंतागुंत व जीवनाचा वेग वाढतच चालला आहे व माणूस माणुसकीला पारखा होत चालला आहे. साहित्याच्या अभ्यासाने हे थोपविता येऊ शकेल. साहित्य माणसाचे जीवनाच्या गुंतागुंतीविषयीचे आकलन वाढविते व त्याला अधिक चांगला नागरिक, सुसंस्कृत माणूस बनविण्यास हातभार लावते. त्याला दुसऱ्याच्या भावना जाणून घेणारी सदय, सहिष्णू व्यक्ती बनविते. शिक्षण प्रक्रियेचे अंतिम साध्य किंवा ध्येय माणसाचे व्यक्तिमत्त्व घडविणे, सुसंस्कृत माणूस निर्माण करणे हेच असते. साहित्याचा अभ्यास या दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्वाचा ठरतो.

प्रचलित अभ्यासक्रमात कला शाखेच्या विद्यार्थ्यांना पदवीसाठी 'मराठी साहित्य' हा विषय अभ्यासता येतो. अकरावी-बारावीच्या स्तरावर या विषयाची पूर्वतयारी झाल्यास त्यांना सोयीचे होईल. वाणिज्य व विज्ञान शाखांच्या विद्यार्थ्यांना मात्र पुढील वर्षांमध्ये मराठी साहित्याच्या अभ्यासाची संधी उपलब्ध नसते. या शाखांमध्ये शिकणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना मराठी साहित्यात रस असतो. पुढील आयुष्यात 'रसिक वाचक' म्हणून जडणघडण होण्यासाठी त्यांना या स्तरावर मराठी साहित्याचा पायाभूत अभ्यास खूपच मोलाचा ठरेल, अशी धारणा आहे.

**उद्दिष्टे :**

१. साहित्य म्हणजे काय, साहित्याची भाषा कशी असते? त्याची ओळख करून देणे.
२. साहित्यातील संकल्पना स्पष्ट करणे.
३. समीक्षेची तत्त्वे स्पष्ट करणे.
४. साहित्यप्रकारांचा सखोल परिचय करून देणे.
५. आकलन, विश्लेषण, अर्थनिर्णयन, मूल्यमापन या क्रमाने अभ्यासाची पद्धत समजावून देणे.
६. विद्यार्थ्यांच्या स्वतंत्र लेखनक्षमतेचा विकास करणे.
७. विद्यार्थ्यांची आकलनशक्ती व वैचारिक क्षमता वाढविणे.
८. सुसंस्कृत व उदार विचारसरणीचा माणूस घडविणे.

**ब. सदर विषयाची अंमलबजावणी पुढीलप्रमाणे-**

१. 'मराठी साहित्य'हा विषय वैकल्पिक म्हणून कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतील विद्यार्थी घेऊ शकतील.
२. एकाच वेळेस विद्यार्थी 'मराठी' व 'मराठी साहित्य' हे दोन्ही विषय घेऊ शकतील.
३. 'मराठी साहित्य' हा विषय शिकविण्यासाठी शिक्षकांची किमान अर्हता एम.ए. (संपूर्ण मराठी) ही असावी.
४. 'मराठी साहित्य' या विषयासाठी तोंडी परीक्षा नसेल. तीऐवजी विद्यार्थी वीस गुणांकरिता दीर्घ निबंध (सुमारे २५ ते ३० पृष्ठे) लिहितील. ऐंशी गुणांकरिता लेखी परीक्षा असेल.

## इयत्ता अकरावी

**भाग १: साहित्याचा अभ्यास**

१) साहित्याचे वाचन व साहित्याचा अभ्यास
२) साहित्याचा अभ्यास का करावयाचा ?
३) साहित्य व इतर ललित कलांचा परस्परसंबंध
४) साहित्याची भाषा (अलंकार, प्रतिमा, प्रतिके इ.)
५) साहित्याच्या अभ्यासातील संज्ञा व संकल्पना

**भाग २ : सूक्ष्म वाचन**

१) कविता – (सुमारे ४०० ओळी –सुमारे २० कविता) प्रामुख्याने आधुनिक कविता, नवकविता व साठोत्तरी कविता.
२) कथा – ५ लघुकथा – सुमारे ४० पाने
३) निबंध – २ वैचारिक, २ ललित– सुमारे १५ पाने
४) एकांक/एकांकिका – सुमारे १५ पाने (भाग १ व भाग २ साठी पाठ्यपुस्तक तयार केले जाईल.)

**भाग २ : स्थूल वाचन**

१) एक लघुकादंबरी
किंवा
२) एक प्रवासवर्णन
(शिफारस केली जाईल.)

## इयत्ता बारावी

**भाग १: मराठी साहित्याचा अभ्यास**

१) मराठीतील विभिन्न साहित्यप्रकार
२) साहित्यकृतीचा अभ्यास व साहित्यकृतीची भाषा (उदा. कविता,नाटक,कादंबरी इ.)
३) साहित्याची समीक्षा व समीक्षेच्या विविध पद्धती सामाजिक – सांस्कृतिक चळवळी व मराठी साहित्य

**भाग २: सूक्ष्म वाचन**

१) कविता –
सुमारे २० कविता – अभंग, ओवी, लावणी, पोवाडा, भारूड, गवळण, भूपाळी, फटका, सुनीत, गझल, हायकू.
२) कथा –
सुमारे ४० पाने –दोन दीर्घकथा
३) ललित गद्य –
सुमारे २० पाने –प्रवासवर्णन,व्यक्तिचित्रण इ.
४) आत्मचरित्रातील उतारे –
सुमारे २० पाने
(भाग १ व भाग २ साठी पाठ्यपुस्तक तयार केले जाईल.)

**भाग २: स्थूल वाचन**

१) एका लेखकाचा एक वैचारिक लेखसंग्रह
**किंवा**
२) एक नाटक
(शिफारस केली जाईल.)

**शिकविण्याचे तंत्र व पद्धती**

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर साहित्याच्या अध्यापनपद्धतीत झालेले बदल व शासनाचे धोरण विचार करता, शिक्षक –विद्यार्थी आंतरक्रिया व सुसंवाद घडेल, अशा पद्धतीने वर्ग चालावा, अशी शिफारस आहे.

१) अभ्यासक्रमाच्या आकलनास मदत होईल,अशा प्रकारे विद्यार्थ्यांना बोलण्यास व लिहिण्यास उद्युक्त करणे.
२) विद्यार्थ्यांना गट करून समीक्षण,रसग्रहण करण्यास सांगणे.
३) दृकश्राव्य माध्यमांचा उपयोग करून एकांकिका,नाटक इ. वाङ्मयप्रकारांचा परिचय करून देणे.

**शिकविण्याचे तंत्र व पद्धती**

१) दीर्घोत्तरी प्रश्न विचारले जातील. वस्तुनिष्ठ किंवा लघूत्तरी प्रश्न विचारण्यात येणार नाहीत..
२) निव्वळ स्मरणशक्तीची परीक्षा करण्याच्या दृष्टीने प्रश्न विचारले जाणार नाहीत.
३) विद्यार्थ्यांना लेखनस्वातंत्र्य दिले जाईल.
उदा. तुम्हाला आवडलेल्या एकांकिकेचे समीक्षण करा.
किंवा
तुम्हाला न आवडलेल्या कवितेचे विश्लेषण करा.

❖❖❖